श्री.दशरथ तांभाळे, विभागीय कृषि सह संचालक, कोल्हापूर यांच्या सेवा महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पामध्ये (SMART) प्रतिनियुक्तीने देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः आकृवि १२१८/प्र.क्र.२९०/१५ अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई - ३२.
तारीख: ०७ मार्च, २०१९.

शासन निर्णय :-

श्री.दशरथ तांभाळे, विभागीय कृषि सह संचालक, कोल्हापूर यांची सेवा खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अतिरिक्त प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) या पदावर (वेतनश्रेणी-रु.१५६००-३९१००, ग्रेड पे रु.७६००/-) प्रतिनियुक्तीने देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ) श्री.दशरथ तांभाळे, विभागीय कृषि सह संचालक, कोल्हापूर हे ज्या तारखेला वरील प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा, ज्या तारखेला ते आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पून्हा स्विकारतील त्या तारखेला समाप्त होईल.

आ) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

क) जर त्यांची सेवा प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) यांना आवश्यक वाटली नाही तर त्यांना श्री. तांभाळे, विभागीय कृषि सह संचालक, यांना मुळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा असेल. मात्र या प्रमाणे परत पाठविण्यापूर्वी प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) यांनी शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्यांला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे.

ड) श्री. तांभाळे यांना महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) हा प्रकल्प सोडून मुळ विभागात परत यावयाचे झाल्यास त्यासाठी त्यांनी कमीत कमी ३ महिन्यांची नोटीस शासनास द्यावी लागेल.

२. तसेच श्री. तांभाळे, कृषि सह संचालक यांच्याकडे विभागीय कृषि सह संचालक, कोल्हापूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात येत आहे.

३. श्री.दशरथ तांभाळे, विभागीय कृषि सह संचालक, कोल्हापूर यांनी त्यांच्या वरील प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजु व्हावे व तसा अहवाल आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

४. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील हे कृपया पहावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०७१७४७३०३६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, serialNumber=fc102de27dc1b41e747ac6cbb491c4209459c3cf340720ea98fd1d95b19c9f65, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2019.03.07 17:50:47 +05'30'

(सु. सं. धपाटे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव.
२. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
४. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART), मुंबई
५. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई
६. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. कृषि सह संचालक, (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
१०. संबंधित विभागीय आयुक्त (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
११. श्री.दशरथ तांभाळे, विभागीय कृषि सह संचालक, कोल्हापूर (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
१२. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
१३. संबंधित अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
१४. निवड नस्ती /१५अे